**<u>महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र अंतर्गत राज्य स्तरावर पुरस्कार वितरित करण्याबाबत.</u>**

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक पुरस्कार २०१२/प्र.क्र.३८/रोहयो-१०
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २३ एप्रिल,२०१२

**प्रस्तावना -**

सन १९७२ साली तीव्र दुष्काळाचा सामना करण्यासाठी महाराष्ट्र विधानपरिषदेचे तत्कालीन सभापती वि.स.पागे यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र राज्यात रोजगार हमी योजना सुरु करण्यात आली होती. या योजनेतून प्रेरीत होऊन केंद्र शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम सन २००५ मध्ये पारित केला. सन २००६ पासून सर्व देशभरात या योजनेच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली. महाराष्ट्रात सन २००६ ते २००८ या कालावधीत टप्प्याटप्प्याने ३३ जिल्हयात सदर योजनेची अंमलबजावणी सुरु झाली. रोजगार हमी योजनेचे जनक वि.स.पागे यांची जन्मशताब्दी यावर्षी साजरी होत आहे. या अधिनियमांतर्गत मजुरांना त्यांचे कायदेशीर हक्क प्राप्त होण्याकरिता अंमलबजावणी करणा-यांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. तरी योजना अंमलबजावणीत उत्कृष्ट कामगिरी करिता वि.स.पागे यांच्या स्मृतीनिमित्त त्यांच्या जन्मदिनाच्या दिवशी म्हणजेच २१ जुलै रोजी राज्यस्तरावर प्रशस्ती पत्र व मानचिन्ह देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी व उत्कृष्ट कामगिरीकरिता उत्कृष्ट जिल्हा, ग्रामपंचायत, कार्यान्वयीन यंत्रणा व अधिकारी वर्ग यांना वि.स.पागे यांच्या स्मृतीनिमित्त त्यांच्या जन्मदिनाच्या दिवशी म्हणजेच २१ जुलै रोजी राज्यस्तरावर प्रशस्ती पत्र व मानचिन्ह देऊन पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

२. सदर पुरस्काराची वर्गवारी पुढीलप्रमाणे असेल.

१. **<u>राज्यस्तरावर तीन जिल्हयांना उत्कृष्ट जिल्हा पुरस्कार</u> (district team)**

<u>पात्रतेचे निकष</u> - MIS व्यवस्थापन व सुधारणा मोहिम ( १ एप्रिल,२०१२ ते ३० जून,२०१२)

२. **<u>ग्रामपंचायतींना उत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कार</u>**

सदर योजनेंतर्गत उत्कृष्ट काम करणा-या ग्रामपंचायतीस उपरोक्त निकषांवर आधारित **प्रत्येक विभागातील दोन ग्रामपंचायतीस** सदर पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

३. **उत्कृष्ट कार्यान्वयीन यंत्रणा-**

या योजनेंतर्गत राज्यस्तरावर उत्कृष्ट काम केलेल्या **प्रत्येक विभागातील २ कार्यान्वयीन यंत्रणांना** पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

४. **उत्कृष्ट कामगिरी पुरस्कार (अधिकारी)-** या योजनेंतर्गत उत्कृष्ट काम करणा-या अधिका-यांना पुरस्कार प्रदान करण्यात येईल. **प्रत्येक विभागातील २ कार्यक्रम अधिकारी तथा तहसिलदार , २ सह कार्यक्रम अधिकारी तथा गट विकास अधिकारी** यांना पुरस्कार देण्यात येईल.

३. **या पुरस्काराची प्रक्रिया पूर्ण करण्याची कालमर्यादा पुढीलप्रमाणे** - पुरस्काराकरिताची निवड त्या आर्थिक वर्षाकरिता केलेल्या कामगिरीवर आधारित असेल. पुरस्काराच्या निवडीकरिता पुढीलप्रमाणे वेळापत्रक:

| अ.क्र. | कामाचा तपशील | पूर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|
| १ | जिल्हयांमार्फत विभागीय आयुक्त कार्यालयास अर्ज करणे | दि. २ जुलै |
| २ | विभागीय आयुक्त कार्यालय स्तरावर प्राथमिक छानननी | दि. ६ जुलै |
| ३ | राज्यस्तरावर नियोजन विभाग (रोहयो) कडे विभागीय आयुक्त कार्यालयाकडून प्रस्ताव पाठविणे | दि. १० जुलै |
| ४ | राज्य शासनाकडून प्रस्तावांची छाननी | दि. १३ जुलै |
| ५ | पुरस्कार वितरण सोहळा | दि. २१ जुलै |

४. **निवडीची प्रक्रिया-**

जिल्हयांकडून पुरस्कारासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची प्राथमिक छाननी शासन स्तरावर नियोजन (रोहयो) विभागाकडून केली जाईल.

प्राथमिक तपासणी अंती पात्र असलेले अर्ज राज्य स्तरावर नियुक्त केलेल्या तज्ञ समितीसमोर सादर केले जातील.

तद्नंतर तज्ञ समितीच्या शिफारशींनुसार निवड केलेल्या पात्र उत्कृष्ट जिल्हा, ग्रामपंचायत, कार्यान्वयीन यंत्रणा व अधिकारी यांना राज्य शासनामार्फत पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

५. **पुरस्काराचे वितरण दि. २१ जुलै,२०१२ रोजी होईल. तसेच पुरस्काराचे स्वरुप प्रमाणपत्र व मानचिन्ह असेल.**

६. राज्य शासनाचे अधिकार- सदर पुरस्काराबाबत राज्य शासनामार्फत वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने




प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
५) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक,
७) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
८) सर्व विभागीय आयुक्त.
९) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र आयुक्तालय, नागपूर
१०) सर्व जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी.(मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
११) सर्व सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद.
१२) सर्व विशेष कार्यकारी अधिकारी व उप विकास आयुक्त (रोहयो).
१३) सर्व उप जिल्हाधिकारी (रोहयो).
१४) उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, रोहयो समिती, महाराष्ट्र विधानमंडळ, विधान भवन, मुंबई.
१५) सर्व उपसचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी (रोहयो प्रभाग)
१६) कक्ष अधिकारी, रोहयो -१, सारसंग्रह
१७) निवडनस्ती, रोहयो-१०.

-----------------